## महत्त्वाचे

### जऊळके वणी विद्यालयात योग दिन

**पिंपळगाव बसवंत ।** जऊळके वणी ता.दिंडोरी येथील मविप्र संस्थेच्या स्व. के. आर डोखळे माध्यमिक विद्यालयात शनिवारी



जागतिक आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका सुजाता निकम यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक योग दिन" साजरा करण्यात आला. यावेळी मुकेश खरे यांनी विद्यार्थांना योगाचे महत्व सांगून योगाचे प्रात्यक्षिक करून दाखवले. सध्याच्या वेगवान व धकाधकीच्या जीवन शैलीमुळे बहुसंख्य नागरीकांना आरोग्य विषयक विविध समस्यांनी ग्रासले असून दररोजच्या आहारात विषयुक्त भाजीपाला, डाळी, धान्य यांचा वापर तसेच तरूण वर्गाचा फास्टफूड कडे वाढलेला कल आरोग्यावर घातक परिणाम करत असून ऊत्तम आरोग्यासाठी सकस व पौष्टिक आहारा सोबत योगासने हाच सर्वोत्तम पर्याय असल्याचे खरे यांनी स्पष्ट केले. यावेळी शिक्षक वृंद, शिक्षकेतर सेवक वृंद, सर्व विद्यार्थी, पालक यांनी योग वर्गात सहभाग नोंदविला.

### ओझरला बोरस्ते विद्यालयात योगदिन

**पिंपळगाव बसवंत ।** येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या माधवराव बोरस्ते विद्यालयात जागतिक योगदिन साजरा करण्यात आला. यावर्षीची योगादिनाची थीम 'एक पृथ्वी एक स्वास्थ्य' ही होती. यामुळे प्रत्येकाची जीवन हे अतिशय महत्त्वाचे असून आपण प्रत्येकाने आपल्या



आरोग्याची काळजी घेतली पाहिजे असे आवाहन मुख्याध्यापक सोपान वाटपाडे यांनी विद्यार्थ्यांना केले. यानिमित्त ओझरचे योगगुरु संतोष सोनवणे यांनी विद्यार्थ्यांकडून अनेक प्रात्यक्षिके करून घेतली. प्रारंभी सामूहिक ओमकार धून सादर करून योगा प्राणायाम भस्त्रीका अनुलोम-विलोम अशी विविध आसने प्रात्यक्षिकांद्वारे घेण्यात आली. 'आरोग्य हीच संपत्ती' यावर संतोष सोनवणे यांनी आरोग्याचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. याप्रसंगी व्यासपीठावर मुख्याध्यापक सोपान वाटपाडे पर्यवेक्षक दशरथ शिंदे प्रभाकर लवांड मनोरमा सोमवंशी उज्वला जाधव उपस्थित होत्या. सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीनी योग प्रात्यक्षिकांचे ज्ञान मिळविले. यावेळी मुख्याध्यापक सोपान वाटपाडे यांच्या हस्ते योगगुरु संतोष सोनवणे, ऋग्वेद सोनवणे यांचा योग दिनानिमित्त सत्कार करण्यात आला.


### उत्तम आरोग्य, प्रसन्न मनासाठी योग आवश्यक : घंगाळे

**पिंपळगाव बसवंत ।** शिकाल तर टिकाल व योगा कराल तर निरोगी जगाल त्यासाठी विद्यार्थ्यांनी नियमित कमीत कमी रोज तीस मिनिट योगासने करून आपले शरीर व मन प्रसन्न ठेवावे, असे आवाहन जनता विद्यालय कोराटे येथील मुख्याध्यापिका आर. आर. घंगाळे यांनी केले. त्या जनता विद्यालय कोराटे येथे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त संपन्न झालेल्या कार्यक्रमात बोलत होत्या. याप्रसंगी शालेय समितीचे अध्यक्ष मंगेशदादा कदम, अभिनव शालेय समितीचे



अध्यक्ष धनश्रीताई कदम, प्रशांत कदम, रोशन शिंदे, बबनअण्णा कदम, गोरख कदम, अरुण माणसाने, नंदू कदम, आप्पा कदम, दीपक कदम, अंबादास कदम, शरद बदादे, भाऊसाहेब कदम, रामभाऊ कदम, सरपंच अश्विनीताई दोडके, दिपक गवे, दीपक दौंड, गोविंद मालसाने आदी गावातील ग्रामस्थांनी शाळेच्या पटांगणात योगासने केलीत व व्यायाम, योगा व आहार यांचे महत्त्व जाणून घेतले. याप्रसंगी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक आबासाहेब शिंदे, नरेंद्र साळुंके, श्री कपिल भामरे, ्रीमती रत्ना जाधव ,श्रीमती रूपाली जाधव, श्रीमती विद्या कदम ,श्रीमती सुमय्या पटेल, श्रीमती अंजली मोरे ,श्रीमती अश्विनी फुगट, सर्व शिक्षकांनी योग दिनाच्या कार्यक्रमात सहकार्य केले.

### प्रभावती यादव यांचे निधन



**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या सेवानिवृत्त आदर्श शिक्षिका प्रभावती देवराम यादव (७०) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे तीन मुलगे, एक मुलगी, सूना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सिन्नर महाविद्यालयातील प्रा. संगिता यादव-गाडे यांच्या त्या आई होत.

# भाजपा मध्य मंडलतर्फे योगदिनानिमित्त 'योग सत्र'

**नाशिक ।** अनंत कान्हेरे मैदान (गोल्फ क्लब) येथील क्रिकेट हॉल मधे मध्य नाशिक मतदार संघातील आमदार प्रा. देवयानी फरांदे यांच्यावतीने मध्य मंडल अध्यक्ष व भाजपा नाशिक महानगर पर्यटन आघाडी अध्यक्ष व योग गुरु नंदकुमार देसाई यांनी बिहार स्कुल ऑफ योग, मुंगेरचे स्वामी शिवराजानंद सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली योगनिद्रा सत्र आयोजित केले होते.



शरीर-मन- बुध्दी आणि अहंकाराचे अलौकिक संतुलन साधणारी ही क्रिया स्वामीनी उपस्थितांकडुन एक तासात करुन घेतली. योग निद्राचे महत्व व योग म्हणजे काय आहे याचे विश्लेषण केले. योग निद्रा केल्यास मानसिक संतुलन राखता येते व ताणतणाव मुक्त रहाता येते. योग म्हणजे अर्थ जोडणे, एकत्र आणणे, मिलन होणे, लक्ष केंद्रित करणे व एकाग्रता करणे असा आहे. भक्ती धामचे अध्यक्ष सविदानंद सरस्वती स्वामी प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित होते. या सत्रासाठी नाशिक मधील प्रसिद्ध डॉ. वडगावकर, डॉ. सुधीर कुलकर्णी, गजरा उद्योगचे सर्वेसर्वा मदन पारख, भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते व संघजन प्रतिष्ठानचे प्रमुख अभय छल्लाणी, भाजपा ज्येष्ठ कार्यकर्ते वासुदेवराव रोहनकर, भाजपा नाशिक महानगर सरचिटणीस नाना शिलेदार, योग विद्या केंद्राचे अध्यक्ष सतीश महाजन, पुष्पा पटनी, शैलेश नाशिककर, लिलाधर वडगावकर, उमेश निफाडकर, सह्याद्री रत्न पुरस्कार समितीचे निलेश पवार, अभिजित अकोलकर, दिलीप गिते, पियुष अमृतकर, नंदकुमार काशेलानी आदी मान्यवरांसह नाशिक क्रिकेट संस्था, जॉगर्स क्लब, ज्येष्ठ नागरिक संघटना प्रतिष्ठित पुरुष व महिला वर्ग शासकीय कर्मचारी जवळपास ३०० हुन अधिक संख्येने लोकांनी आंतरराष्ट्रीय योग दिनात उत्स्फूर्तपणे आपला सहभाग नोंदविला.

# वाय. डी. बिटको गर्ल्स हायस्कूल, ज्युनिअर कॉलेजमध्ये योगदिन

**नाशिक ।** दि न्यू एज्युकेशन इन्स्टिट्यूट, नाशिक संचलित यशोदामाता डायाभाई बिटको गर्ल्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, नाशिक या शाळेत २१ जूनला आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात आला. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सविता कुशारे यांनी आपल्या मनोगतातून आंतरराष्ट्रीय योगदिनाचे महत्त्व सांगतांना योगाचा मुख्य उद्देश लोकांना योगाच्या फायद्यांबद्दल जागरूक करणे आहे.



आजच्या धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर तंदुरुस्त ठेवून मनावरही चांगले संस्कार करता येतात. तसेच मानसिक, शारीरिक आणि भावनिक संतूलन नीट राहण्यासाठी योगासने करणे खूप गरजेचे आहे असे सांगितले. उपमुख्याध्यापक राजेंद्र सोमवंशी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करुन सुत्रसंचालन व नियोजन केले. योगशिक्षक किसन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली योग प्रात्यक्षिके घेण्यात आले. त्यात विद्यार्थिनींनी योगसाधना केली. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष प्रकाश वैशंपायन, उपाध्यक्ष प्रभाकर कुलकर्णी, सेक्रेटरी हेमंत बरकले, शालेय समिती चेअरमन रमेश महाशब्दे यांनी शुभेच्छा दिल्या. शाळेच्या मुख्याध्यापिका कुशारे, अधिक्षिका मीना वाळूंजे, उपमुख्याध्यापक राजेंद्र सोमवंशी, ज्युनिअर कॉलेजचे उपमुख्याध्यापक मिलिंद कोठावदे, पर्यवेक्षिका सुषमा गवारे, गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्यकैलास बागुल, भारती चंद्रात्रे सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थिनी उपस्थित होते. फलक लेखन सायली मुळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक गणपत मुकणे, मेघना देशपांडे, चेतना टोपले, किसन बागुल, शालेय कर्मचारी सुरज काळे, गायकर, दत्ता गायकवाड, लता निरभवणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# देवळा येथे जिजामाता कन्या विद्यालयात योग साधना

**देवळा ।** योग ही एक प्राचीन पद्धत आहे जी भारतात ५, ००० वर्षांपूर्वी उगम पावली.शरीर, मन आणि आत्म्याच्या कल्याणासाठी योगा ही पद्धत विकसित करण्यात आली आहे.योग आसन, प्राणायाम आणि ध्यान यांच्या संयोजनाद्वारे शारीरिक शक्ती, मानसिक स्पष्टता आणि भावनिक संतुलनास प्रोत्साहन देण्यात मदत होते. योगाच्या फायद्यांबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि जगभरात त्याच्या सरावाचा प्रचार करण्यासाठी दरवर्षी २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा केला जातो.२०२५ या वर्षाची जागतिक योग दिनाची थीम "एक पृथ्वी, एक आरोग्य यासाठी योग"आहे.योगाने



संपूर्ण जग निरोगी करणे ही कल्पना आहे.ही थीम आपल्या स्वतःच्या आरोग्याशी आणि आपल्या ग्रहाच्या आरोग्याशी असलेल्या खोल संबंधांवर भर देते. यानिमित् देवळा एज्युकेशन सोसायटी संचालित, जिजामाता कन्या विद्यालयात जागतिक योग दिनाचे आयोजन करण्यात आले. देवळा तालुक्यातील अनुप ओमप्रकाश पटेल हे प्रदीर्घ अनुभव असलेल्या योगगुरू शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शालेय आवारात सर्व उपस्थित कर्मचारी व ७३२ विद्यार्थिनींना सामूहिकरित्या विविध योगासने घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी मुख्याध्यापिका श्रीमती सुनिता पगार, पर्यवेक्षक कौतिक खोंडे आदींसह शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

# देवळा महाविद्यालयात योग दिन साजरा

**देवळा ।** देवळा येथील आहेर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षीचा योग दिन "योग फॉर वन अर्थ, वन हेल्थ" या संकल्पनेवर आधारित होता. या विशेष दिनानिमित्त राष्ट्रीय छात्र सेना , राष्ट्रीय सेवा योजना, शारीरिक शिक्षण विभाग आणि ग्रामीण रुग्णालय देवळा यांच्या संयुक्त विद्यमाने योगा व ध्यान कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.



प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक व उपप्राचार्य डॉ. डि. के. आहेर यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविक मध्ये "वन अर्थ, वन हेल्थ" या संकल्पनेचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की,"पृथ्वी ही आपली एकच जागा आहे. मानव, प्राणी, वनस्पती व पर्यावरण यांचे आरोग्य परस्परावलंबी आहे. आपण जेव्हा आपले आरोग्य जपतो, तेव्हा पर्यावरणाचा ही विचार करणे आवश्यक आहे. योग हे आपल्याला संतुलन, शिस्त व सहजीवन शिकवतो." याप्रसंगी योग प्रशिक्षक कु. रिद्धी खरोटे हिने योग ही भारतीय संस्कृतीची अमूल्य देणगी आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात योग शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहे, आपण सर्वजण एकाच परिसंस्थेचा भाग आहोत. मानव, प्राणी आणि निसर्ग यांचे आरोग्य एकमेकांशी जोडलेले आहे. योगाच्या माध्यमातून समरसता व शाश्वततेचा मार्ग आपल्याला गवसतो," असे सांगितले. त्यानंतर त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना विविध योगासने, प्राणायाम व ध्यान यांचे मार्गदर्शन केले. व त्यांच्या समवेत कु. निशा आहेराव व कु. पल्लवी भामरे यांनी योगाचे प्रात्यक्षिक करून दाखविले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हितेंद्र आहेर होते. त्यांनी योगाचा शैक्षणिक व मानसिक आरोग्यावर होणारा सकारात्मक परिणाम अधोरेखित करत विद्यार्थ्यांना नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन केले.

# शहर, जिल्हा परिसरात विविध ठिकाणी योगदिन उत्साहात

**नाशिक ।** जिल्ह्यात व शहर परिसरात सर्वत्र योगदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी तरुणांसह ज्येष्ठ नागरिक व मुलांनी देखील योगदिनात आपला सहभाग नोंदविला.

**शारीरिक आणि मानसिक संतुलनासाठी योगाभ्यासाची गरज : बाळासाहेब क्षीरसागर**


**निफाड ।** भौतिक सुखसोयी आणि चंगळवाद यांच्या पाठीमागे धावणाऱ्या माणसाला सातत्याने वाढत जाणा-या स्पर्धेला समोरे जावे लागते. त्यामुळे त्यांची मानसिक आणि शारीरिक स्थिती बिघडत आहे. परिणामी माणूस ताणवग्रस्त आणि चिंताग्रस्त बनून अनेक प्रकारच्या आजारपणात तो अडकला आहे, या नैराश्यग्रस्त आणि ताणवग्रस्त अवस्थेतून माणसाला सुस्थितीत येण्यासाठी योगाभ्यासाची नितांत गरज आहे. त्यायोगे माणसाचे मानसिक आणि शारीरिक संतुलन



आबाधित राहील. कुटुंब आणि समाज व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने शास्त्रशुद्ध योगासने करणे ही काळाची गरज बनत आहे. असे प्रतिपादन मविप्र समाजाचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे, योगप्रशिक्षक कु. गायत्री सोनवणे, डॉ. प्रवीण ढेपले, प्रा.अभय वडघुले, डॉ. सुसान लॉरेनसिया, प्रा. योगेश कडलग, शा. शि. संचालक प्रा.चंद्रशेखर मोरे प्रा.चेतन कुंदे, सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका उपस्थित होते. महाविद्यालयाच्या वतीने ०७ जून ते २० जून यादरम्यान सर्व विद्यार्थ्यासाठी ऑनलाईन पद्धतीने योग प्रशिक्षण शिबिराचे आयोजित करण्यात आले होते.योग प्रशिक्षक गायत्री सोनवणे व चंद्रशेखर मोरे यांनी योग प्रकारांची प्रात्यक्षिके केली.

**जनता विद्यालय कोमलवाडी येथे योग दिन उत्साहात साजरा**

**सिन्नर ।** मराठा विद्या प्रसारक समाज जनता



विद्यालय, कोमलवाडी तालुका सिन्नर या विद्यालयात मंगलमय वातावरणात योग दिन उत्साह साजरा करण्यात आला. विद्यालयातील शिक्षकांसह 300 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल नाईक होते. योगशिक्षक गोजरे यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व, फायदे, योग दिन का साजरा केला जातो याविषयी सविस्तर माहिती देऊन विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात दररोज योगा केल्यास तुम्ही शारीरिक आजारापासून दूर राहाल, योगामुळे शारीरिक व मानसिक शक्ती वाढण्यास मदत होते म्हणून विद्यार्थ्यांनी दररोज योगासने करावे असे आवाहन गोजरे यांनी केले. आसनांच्या प्रकारामध्ये ताडासन, भुजंगासन, त्रिकोणासन, प्राणायाम, शांतीपाठ, शवासन व सूर्यनमस्काराचे आयोजन करण्यात आले होते.

**आर्ट ऑफ लिवींगतर्फे योग दिन साजरा**


**नाशिक ।** नियमित योगा केल्याने तणाव कमी होतो, शरीर मजबूत होते आणि एकाग्रता वाढते, शरीर मजबूत



आणि लवचिक होते, विविध आसने केल्याने स्नायू बळकट होतात आणि शरीराची हालचाल करण्याची क्षमता वाढते यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी योग साधनेचे विशेष महत्व असल्याचे प्रतिपादन निवडणूक शाखेचे उपजिल्हाधिकारी शशीकांत मंगरूळे यांनी केले. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आर्ट ऑफ लिव्हींग व डॉक्टरांच्या सर्व संघटना यांच्या वतीने योग व मेडीटेशन सत्राचे आयोजन तुपसाखरे लॉन्स येथे करण्यात आले होते यावेळी श्री. मंगरूळे बोलत होते. यावेळी आर्ट ऑफ लिविंग चे फॅकल्टी मेंबर दिनेश कापडीया यांनी योगाचे प्रात्यक्षिके सादर करून त्याचे महत्व विषद केले. यानंतर स्वामी प्रणवानंदजी यांनी ध्यान (मेडीटेशन) धारणेचा दैनंदिन जीवनमानावर कसा परिणाम होतो याचेही प्रात्याक्षिकाद्वारे उपस्थित योगा प्रेमींकडून करून घेतले. यावेळी जीवन अधिक निरोगी, आनंदी आणि समाधानी होऊ शकते. यावेळी आर्ट ऑफ लिव्हींग मेंबर्स, आयएमए, एफपीए, निमा नवीन नाशिक, निमा नाशिक सिटी या डॉक्टर्स संघटनांशी विशेष सहभाग नोंदविला. 125 हुन अधिक योगा प्रेमींनी सहभाग नोंदविला.

**थोरात विद्यालयात योगदिन व संगित दिन साजरा**

**पिंपळगाव बसवंत ।** मविप्र संचलित कर्मवीर रावसाहेब थोरात विद्यालय व जुनिअर कॉलेज, मोहाडी येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर मविप्रचे संचालक प्रवीण जाधव, एस. एस. जाधव, गजेंद्र शेंद्रे, प्राचार्य शरयू भामरे, पर्यवेक्षक रवींद्र निकम, प्रदीप जाधव, हरिभाऊ



कोर, पंढरीनाथ संगमनेरे आदी मान्यवर उपस्थित होते. शाळेचे माजी विद्यार्थी गजेंद्र शेंद्रे व उपशिक्षक रवींद्र बच्छाव यांनी मोहाडी हायस्कूल मधील विद्यार्थ्यांना योगाचे धडे दिले. योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर व मन तंदुरुस्त ठेवू शकतो व मनावरही चांगले संस्कार करू शकतो असे प्रतिपादन केले. त्यानंतर गजेंद्र शेंद्रे व रवींद्र बच्छाव यांनी विद्यार्थ्यांना योगा व प्राणायामाचे प्रात्यक्षिके करून दाखवली. त्यामध्ये त्यांनी सूर्यनमस्कार, ताडासन वृक्षासन, अनुलोम-विलोम, शवासन व संगीतमय व्यायाम प्रकार यांची प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांकडून करून घेतली. सर्व विद्यार्थी व शिक्षक यांनी अतिशय उत्साहात योगा व प्राणायामाचे प्रात्यक्षिके केली. .

**योग दिनानिमित्त 'करा योग रहा निरोग'चा नारा**

**देवळा ।** मराठा विद्या प्रसारक समाज संचलित,देवळा येथील अभिनव बाल विकास मंदिर व जनता विद्यालयात मुख्याध्यापक मनिष बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली



आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी "करा योग राहा निरोग" चा नारा देत विद्यालयातील क्रीडाशिक्षक राकेश बिरारी यांनी योग दिनाविषयी माहिती देत वेगवेगळ्या प्रकारचे योगासनाचे प्रात्यक्षिक करून दाखवत विद्यार्थ्यांकडून तशाप्रकारे योगासने करून घेतले. यात शिक्षक,विद्यार्थी यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत वेगवेगळ्या प्रकारची योगासन केली. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**योग साधनेमुळे शरीर व मन स्वास्थ्य लाभते : प्राचार्या अल्फोंसा डी.**

**इगतपुरी ।** मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूल येथे 21 जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. योग दिनाचे औचित्य साधत योग साधनेमुळे



शरीर व मन स्वास्थ्य लाभते, असे प्रतिपादन शाळेच्या प्राचार्या अल्फोंसा डी. यांनी केले. अकोल्यासारख्या दुर्गम व आदिवासी तालुक्यांमध्ये नावारूपाला आलेली ही एक शाळा आहे. आपल्या भारतीय प्राचीन संस्कृती, परंपरा यामध्ये योग, योगासने, योगसाधना, प्राणायाम, अनुलोम-विलोम, सूर्यनमस्कार यांना अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर तर तंदुरुस्त ठेवू शकतो त्याशिवाय मनावरही चांगले संस्कार करू शकतो व योग साधनेचे महत्त्व व फायदे हे योगशिक्षिका अश्विनी काळे यांनी प्रस्तावने तून विद्यार्थ्यांना सांगितले.प्रथमता या कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी योगाची प्रात्यक्षिके, प्रार्थना, प्राणायाम, तसेच सूर्यनमस्कार घातले. यामध्ये शाळेतील 1000 विद्यार्थ्यांनी योग प्रात्यक्षिकांमध्ये सहभाग घेतला. तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही प्रात्यक्षिके केली. 21 जून हा उत्तर गोलार्धातील सर्वात मोठा दिवस असतो आणि तोच आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून सर्वत्र जगभर साजरा केला जातो.

**लोहोणेर जनता विद्यालयात विद्यार्थ्यांना योग साधनेचे धडे**

**देवळा ।** लोहोणेर येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या जनता विद्यालय,अभिनव बालविकास मंदिर आणि विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दरवर्षी २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो या दिनाचे औचित्य साधून विद्यालयात विद्यार्थी योगाची विविध प्रात्यक्षिके करण्यात आली. सदर कार्यक्रम प्रसंगी माध्यमिक शालेय समिती अध्यक्ष



भैय्यासाहेब देशमुख, उच्च माध्यमिक समिती अध्यक्ष नितीन आहेर, किशोर आहेर, शेखर आहेर, शालेय समिती सदस्य पंडित निकम, अनिल धामणे, अनंत शेवाळे, संजय सोनवणे, डॉ. सुभाष आहेर, संजय जगताप, किशोर जाधव, समाधान महाजन, विलास जाधव, मुख्याध्यापिका एस.यू.सागर, पर्यवेक्षक आर.एच.देसले आदींसह शिक्षकवृंद व्यासपीठावर उपस्थित होते.२१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून का साजरा केला जातो याविषयी सुनिल एखंडे यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. योग दिनाची सुरुवात प्रार्थनेने करण्यात आली.त्यानंतर विद्यार्थ्यांनी दंड स्थितीतील , बैठे स्थितीतील, पोटावर व पाठीवर झोपून करायची आसने, कपाल भारती, प्राणायाम, शांतीपाठ आदी योगाची विविध प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांनी शिक्षक सुनिल एखंडे क्रीडा, शिक्षक शशिकांत ठाकरे, विजय निकम, शशिकांत आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली केली.विद्यार्थ्यांनी योगाची प्रात्यक्षिके करत योगाचे महत्व समजून घेतले.यावेळी अभिनव बालविकास मंदिर, जनता विद्यालय व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालायाच्या विद्यार्थ्यांनी प्रात्याक्षिके करत योग साधनेचे महत्व समजून घेतले. योगदिनाच्या निमित्ताने एकुण ९७० विद्यार्थी आणि ७९ शिक्षकवृंदानी योगाची प्रात्यक्षिके केली.सदर कार्यक्रम प्रसंगी शिक्षक पालक उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक समिती प्रमुख सुनिल एखंडे यांनी केले.




# झाडे वाळली, भ्रष्टाचार फुलला!

## माझी वसुंधरा योजनेत त्र्यंबक नगर परिषदेचा 'हरित' घोटाळा । चौकशीची मागणी

**नाशिक ।** त्र्यंबक नगर परिषदेतर्फे राबवलेली 'माझी वसुंधरा' योजना ही शासनाच्या डोळ्यात निव्वळ धुळफेक असून ठेकेदार आणि अधिकाऱ्यांनी संगनमताने या योजनेसाठी असलेल्या निधीचा मलिदा वरपल्याचे आरोप होत आहे. या योजनेअंतर्गत त्रंबकेश्वर मधील विविध भागात झाडे लावण्याचा दावा त्र्यंबक नगर परिषदेकडून केला जात असताना प्रत्यक्ष स्थळी पाहणीत सदरची झाडे अस्तित्वात नसल्याने या योजनेसाठी लागलेला पैसा नेमका कुणाच्या घशात गेला आहे, याबाबत आता उलट सुलट चर्चा होत आहे. या प्रकरणाचा बुरखा फाटल्यानंतरही नगरपरिषदेकडून संबंधित ठेकेदाराला कुठलीही विचारणा झालेली नाही किंबहुना कारणे दाखवा नोटीसही नाही. त्यामुळे या प्रकरणातील ठेकेदाराला त्र्यंबक नगर परिषदेचा वरदहस्त आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

मार्च २०२४ मध्ये मोठा गाजावाजा करीत त्र्यंबक नगर परिषदेकडून 'माझी वसुंधरा' योजनेअंतर्गत वृक्षारोपण करण्यात आल्याचे दर्शविण्यात आले.मात्र वर्षभरानंतर नगरपरिषदेची नौटंकी उघड झाली आहे. लावलेल्या झाडांची दुर्दशा झाल्याने नगर परिषदेचा दावा फोल ठरत असून या योजनेसाठी खर्च झालेल्या एक कोटी रुपयांच्या निधी बाबत आता संभ्रम निर्माण झाला आहे. वास्तविक झाडे लावणे आणि ती जगविण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदार श्रीराज इंटरप्राईजेस यांची असताना त्यांनी याबाबत हात झटकल्याची त्र्यंबक मध्ये चर्चा आहे. त्यामुळे शासकीय अनास्थेचा फटका पर्यावरणाला देखील बसला असून ज्या विभागाने हा निधी पुरवला आहे तो विभाग याची दखल घेईल का?असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने सर्वसामान्य नागरिकांना निसर्गातील पंचभूतांशी समरस होण्याकरिता शासनाकडून युद्ध पातळीवर ही योजना राबविण्याचा धडाका सुरू आहे. असे असताना लाडक्या ठेकेदारासाठी त्र्यंबक नगर परिषदे कडून मात्र शासनाच्या डोळ्यात धुळफेक केली जात असल्याने या योजनेला हरताळ फासल्याचे स्पष्ट झाले आहे.

त्रंबकेश्वर शहरातील सिटीसर्वे नंबर ६४८ चौकी माथा, गट नंबर २९९/ १ + ३०२/३ बटरफ्लाय गार्डन, गट नंबर १०२/१/२/४/५ यातील काही भाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते गजानन महाराज मंदिर चौक येथील रस्ता दुभाजक, समर्थ कमान ते गजानन महाराज चौक, सितारा हॉटेल या परिसरातील रस्ते दुभाजक, सितारा हॉटेल जवळचा परिसर, स्वामी समर्थ मंदिर कमान ते भंडारा, नील पर्वत, कैलास राजा नगर येथील सायकल ट्रॅक, गट नंबर १८३ राशी वन,नक्षत्र वन, ब्रह्मगिरी पायथा या भागात झाडे लावल्याचे कागदोपत्री दिसत आहे. मात्र या भागात फेरफटका मारला असता बहुतांश ठिकाणी झाडे आढळून आलेली नाहीत किंबहुना जी झाडे लावलेली आहेत त्यांची अक्षरशः दुर्दशा झालेली असून संरक्षण जाळ्यांची देखील मोठ्या प्रमाणावर वाताहात झाल्याचे दिसून येत आहे.

तब्बल १ कोटी रुपये खर्चून राबवलेल्या योजनेचे अक्षरशः तीनतेरा वाजल्याने याला जबाबदार कोण? असा सवाल उपस्थित केला जात आहे.दरम्यान यातील गंभीर बाब म्हणजे ज्या ठेकेदाराने झाडे लावण्याची किमया केली आहे.त्या ठेकेदाराविरुद्ध नगरपरिषदेने अद्याप कुठलीही कारवाई न केल्याने नगरपरिषदेचे वरिष्ठ अधिकारी या योजनेचे लाभार्थी आहे का? असा सवाल विचारला जात आहे. ठेकेदारा विरुद्ध कारवाई होत नसल्याने नगरपालिकेचा या कंत्राटामध्ये छुपा सहभाग असल्याबाबत त्रंबक मध्ये उलटसुलट चर्चा सुरू आहे.

संबंधित ठेकेदाराविरुद्ध कारवाई होत नसल्याने त्याला नेमकं कोण पाठीशी घालतय याबाबत देखील चौकशी करण्याची मागणी केली जात आहे. या योजनेत विकत घेतलेल्या झाडांच्या बाजारमूल्यामध्ये देखील मोठी तफावत आढळून आल्याचे बोलले जाते त्यामुळे फळझाडे, शोभेची झाडे, फुलझाडे आणि औषधी झाडांचे बाजार मूल्य तपासण्याची मागणी केली जात आहे. त्र्यंबक शहरातील एका प्रतिष्ठित बँकेने नगरपरिषदेला वृक्षारोपणासाठी हजारो झाडे दिली होती. ती झाडे कुठे आहेत यांचाही तपास करण्याची मागणी केली जात आहे.

दरम्यान या प्रकरणी प्रांताधिकारी ओंकार पवार यांच्याकडे अनेकांनी तक्रारी दाखल केल्या असून त्यांच्याकडून या योजनेची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्याची मागणी स्थानिकांकडून केली जात आहे. या योजनेत मोठा भ्रष्टाचार झाल्याचा संशय घेतला जात असून याप्रकरणी कसून चौकशी करून यामध्ये दोषी असणाऱ्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

## ➤ महत्त्वाचे

### दिंडोरी येथे भाजपच्या सुशासन रथाचे स्वागत

**दिंडोरी ।** दिंडोरी येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने मोदी सरकारच्या धोरणांची



माहिती देणारा सेवा सुशासन रथाचे आगमन झाले असून या रथाचे दिंडोरी मंडलात जोरदार स्वागत करण्यात आले. या रथाच्या माध्यमातून अकरा वर्षात मोदी सरकारने केलेल्या कामांची माहिती भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी दिली प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना, प्रधानमंत्री आवास योजना, हर घर जल योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री सनदी योजना, शेतकऱ्यांसाठीच्या योजना आदींची माहिती भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी दिंडोरी करांना दिली महिलांसाठी राबवण्यात आलेल्या योजनांची माहिती देण्यात आली यावेळी दिंडोरी मंडल अध्यक्ष श्याम मुरकुटे त्याचप्रमाणे विधानसभा संयोजक रणजीत देशमुख यांनी माहिती देताना मोदी सरकार देशाच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले राज्यात सुद्धा फडणवीस सरकारच्या माध्यमातून सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यात असल्याचे मुरकुटे,देशमुख यांनी सांगितले. यावेळी शहराध्यक्ष नितीन गांगुर्ड, मित्रानंद जाधव, शांताराम जाधव, गणेश बुणगे, दिगंबर ढाकणे, राजू शिंदे, डॉक्टर शीतल कुमार पहाडे, संभाजी पाटील, घुगे आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रामचंद्र राऊत यांचे निधन



**नाशिक ।** निफाड तालुक्यातील मांजरगाव रहिवासी,मविप्रचे सेवानिवृत्त उपशिक्षक, स्वाध्याय परिवार साधक रामचंद्र बंडू राऊत (७४) (मुळगाव-पोखरी ता. नांदगाव) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, मुलगी, २ भाऊ, ३ बहिणी, सुना, जावई, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. स्वाध्याय परिवार साधक योगेश राऊत आणि प्रसिध्द चित्रकार सुरेश राऊत यांचे ते वडील होत.

### अजय जगताप यांचे निधन



**नाशिक ।** पंचवटी येथील उदय कॉलनीतील रहिवासी अजय विजय जगताप (४९) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी असा परिवार आहे ते पंचवटीतील सामाजिक कार्यकर्ते बब्बूभाई भगत यांचे मावस भाऊ होत.

## आदिवासी भागातील सुप्त कला उजळली; झिरवळांची कौतुकाची थाप

**इगतपुरी ।** तालुक्यातील दुर्गम आणि आदिवासी भागात शिक्षणाची दीपशिखा तेवू लागली असून, या भागातील तरुण आता शिक्षणाच्या प्रवाहात येत उच्चपदावर आपले कर्तृत्व सिध्द करत आहेत. खडकेद इंदूरे येथील माजी जिल्हा परिषद सदस्य केरू दादा खतिले यांचे सुपुत्र यांनी वैद्यकीय क्षेत्रात मोठे यश मिळवले असून, त्यांच्याद्वारे स्थापन करण्यात आलेल्या 'सिद्धीविनायक हॉस्पिटल' चं घोटी येथे उद्घाटन करण्यात आलं.




या उद्घाटनप्रसंगी अन्न व औषध प्रशासन मंत्री ना. नरहरी झिरवळ यांनी आदिवासी विद्यार्थ्यांच्या सुप्तकलांची स्तुती करताना म्हटलं, "आश्रमशाळेत शिकून जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर एक विद्यार्थी डॉक्टर बनतो, ही बाब संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे. सामान्य कुटुंबातून आलेला युवक एम.बी.बी.एस. होतो आणि स्वतःचं हॉस्पिटल सुरू करून गरजूंना सेवा देतो, ही इगतपुरी तालुक्यासाठी अभिमानास्पद बाब आहे." कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार हिरामण खोसकर होते. डॉ. संपत खतेले व डॉ. सुप्रिया सुपे खतेले यांच्या संचालकत्वाखालील या रुग्णालयामार्फत ग्रामीण व आदिवासी जनतेसाठी दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होणार असल्याचा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला. व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांमध्ये माजी जिल्हा परिषद सदस्य जनार्धन मामा माळी, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे गोरख बोडके, सीमंतिनी कोकाटे, पोलीस निरीक्षक विजय शिंदे, माजी आमदार शिवराम झोले, रघुनाथ तोकडे, केरु दादा खतेले, बाळासाहेब झोले, विठ्ठल लंगडे, संपत काळे, तुकाराम वारघडे, बाळासाहेब गाढवे, पांडुरंग वारुंगसे, उदय जाधव, दिलीप चौधरी, वसंत भोसले, अण्णा पवार, सुनील वाजे, अनिल चौधरी, मदन कडू आदींचा समावेश होता.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन विजयकुमार कर्डक यांनी केले तर डॉ. सुप्रिया सुपे खतेले यांनी उपस्थितांचे आभार मानले. सिद्धीविनायक हॉस्पिटलमुळे ग्रामीण रुग्णांना नवा दिलासा मिळणार आहे, अशी प्रतिक्रिया उपस्थितांमध्ये उमटली. आदिवासी समाजातून डॉक्टर घडून समाजसेवेसाठी उभा राहत असल्याने या यशाचा उत्सव गावकऱ्यांनीही मोठ्या आनंदात साजरा केला.

## इगतपुरी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन

**नाशिक ।** येथील कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने महाविद्यालयात ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालयाच्या इनडोअर स्टेडियम मध्ये विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर



कर्मचारी यांनी उत्फुर्त सहभाग घेऊन क्रिडासंचालक हरेश वसावे, दत्तु आहिरे यांनी योगासनाचे महत्त्व व त्याचे विविध प्रकार मंडूकासन, शशकासन, गोमुखासन, वक्रासन, भुजंगासन, शलभासन, मर्कटासन, पवनमुक्तासन, अर्ध पवनमुक्तासन, अर्ध-हलासन, पादव्रित्तासन सूर्य नमस्कार याचे धडे प्रत्यक्ष देऊन योगाचे मानवी जीवनात शारीरिक, मानसिक व बौद्धिक, अध्यात्मिक महत्व पटवून दिले या निमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.किरण रकिबे यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे महत्व सांगताना 'योगशास्त्र' ही भारताने जगाला दिलेली अमुल्य देणगी असून यामुळे मानवी जीवन ताणतणाव विरहीत होण्यात मदत झाली आहे.

## महापालिकेत हंड्रेड प्लससाठी भाजपकडून बेरजेचे राजकारण

### पक्ष प्रवेशासाठी महाजन ठरताहेत संकटमोचक

आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपाला सर्वत्र आपलाच वरचष्मा हवा आहे. त्यामुळेच पक्षवृद्धी या गोंडस नावाखाली भाजपने पक्षात येईल त्याला पावन करून घेण्याचे धोरण अवलंबल्याचे दिसते. शहर-जिल्ह्यात बहुचर्चित ठरलेल्या सुधाकर बडगुजर यांच्या पक्षप्रवेशाच्या निमित्ताने निदर्शनास आले आहे. महायुतीच्या माध्यमातून निवडणुका लढविण्याची एकीकडे घोषणा करायची आणि दुसरीकडे स्वबळावरही तयारीसाठी कार्यकर्त्यांना बळ पुरवायचे हे त्याचेच द्योतक आहे.



भाजपला नाशिक महापालिकेत कोणत्याही परिस्थितीत सत्ता हवी आहे. त्यादृष्टीने भाजपची वाटचाल सुरू आहे. भाजपला यंदा महापालिकेत हंड्रेड प्लस संख्याबळाचा आकडा गाठायचा आहे. त्यामुळेच अंतर्गत प्रचंड विरोध असूनही साऱ्यांच्या नाकावर टिचून बडगुजर यांना पक्षात घेऊन भाजपने काहीतरी समीकरणे जुळवली असणार यात शंका नाही. नाशिकसाठी संकटमोचकाची भूमिका निभावणाऱ्या गिरीश महाजन यांनी यासाठी विशेष प्रयत्न केले. भाजपने शहर-जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यात घेण्यासाठी बेरजेचे राजकारण सुरू केले आहे. विरोधाच्या तीव्र हिंदोळ्यावरही बडगुजर यांचा झालेला पक्षप्रवेश त्याचाच एक भाग आहे. राजधानी मुंबईत बडगुजर यांच्या हाती कमळ देऊन त्यांना भाजपात सन्मानाने प्रवेश देण्यात आला. अजूनही प्रवेश सोहळे होणार असल्याचे सांगताना भाजप पक्षश्रेष्ठींनी बेरजेच्या राजकारणासाठी अजूनही अनेक बडगुजरांसारखे चर्चित-बहुचर्चितांचा प्रवेश घडवून आणणार असल्याचे ठणकावूनही सांगितले. त्यामुळे कदाचित नाशिक शहर-जिल्ह्यात भाजपने "बडगुजर पॅटर्न" राबविला तर त्यात आश्चर्य वाटायला नको किंबहुना तसाच पॅटर्न वापरला जाऊन येणाऱ्याला पावन करून घेतले जाणार असल्याची खमंग चर्चा आहे.




नाशिक महापालिकेच्या निवडणुका जर महायुतीच्या माध्यमातून लढविण्याची वल्गना भाजप करीत असेल तर महायुतीतील घटक पक्ष शिंदे गटाची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी यांना न्याय कसा देणार असा प्रश्न तीनही घटक पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये चर्चेतून उपस्थित केला जात आहे. महायुती धर्मातून निवडणूक लढविली गेली तर महायुतीला महापालिकेत हंड्रेड प्लस जागा जिंकणे अवघड नाही; परंतु भाजपला जर स्वतःलाच हंड्रेड प्लस जागा हव्या असतील आणि त्यासाठी भाजप नाना उद्योग करत असेल तर शिवसेना, राष्ट्रवादी महायुती धर्म निभावेल का, असाही प्रश्न उपस्थित झाल्याशिवाय राहत नाही. यातूनच कदाचित महायुतीत मैत्रीपूर्ण लढतीचा पर्याय सर्वानुमते निवडला जाण्याची शक्यताही नाकारता येत नाही. तसे झाले तर महापालिकेवर महायुतीतील कोणत्याही घटक पक्षाला एकहाती सत्ता हस्तगत करता येईल, असे सांगणे धाडसाचे ठरेल. त्यातून झाला तर महाआघाडीलाच फायदा होऊ शकतो. अर्थात महायुतीत मैत्रीपूर्ण लढतीनुसार निवडणुका लढविल्या गेल्या तरी सत्तेसाठी पुन्हा हे घटक पक्ष एकत्र मोट बांधतील यात शंका नाही. बडगुजर यांच्या भाजपात येण्याने नाही म्हणायला सिडकोतून भाजपला बळ मिळेल यात शंका नाही; परंतु नाराज भाजप मंडळींचे या बळाला सहकार्य लाभेल असे म्हणणे धाडसाचे ठरेल. बडगुजर यांचे महापालिकेत चांगले वर्चस्व आहेत यात शंका नाही. त्यामुळेच महाजन यांनी बडगुजर यांच्या सहकार्याने निवडणूक कॅच करण्याचा प्रयत्न केला असावा. शहरात शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांचे प्राबल्य आहे. शिवसेनेचा ठाकरे गत, राष्ट्रवादीचा शरद पवार गट यांचीही थोडीफार ताकद आहेच. अशा परिस्थितीत भाजप महापालिकेत हंड्रेड प्लसचे स्वप्नरंजन करत आहे. भाजपला शहरात फिलगुड वातावरण आहे यात शंका नाही. गेल्या वेळेस भाजपने एकहाती सत्ताही घेतली; परंतु एकट्या भाजपच्या बळावर महापालिकेत हंड्रेड प्लसची मल्लिनाथी जरा जास्तच वाटते. त्यामुळे भाजप तोडा, फोडा अन पक्ष वाढवा असे बेरजेचे राजकारण करीत असून, गुन्हेगारीसह इतर गोष्टींमुळे वलयांकित झालेल्या मंडळींनाही पक्षप्रवेश देऊन पावन करून घेत असल्याची चर्चा आहे. बडगुजर यांचा झालेला पक्षप्रवेश हे त्याचे द्योतक आहे.

### भाईंसाठीही महाजन ठरतायेत संकटमोचक

गिरीश महाजन यांनी नाशिक भाजपसाठी नेहमीच संकटमोचकाची भूमिका निभावत मोलाचे सहकार्य केले आहे. त्यामुळे शहर भाजपातील अनेक मंडळींसाठी ते गळ्यातील ताईत ठरले आहेत. बडगुजर यांच्यासह काही मंडळींना पक्षात घेण्यास विरोध करणाऱ्यांच्या काही मंडळींच्याही ते गळ्यातील ताईत होते. त्यामुळे सारे महाजन यांच्याकडे गाऱ्हाणे घेऊन गेले होते; पण खुद्द संकटमोचकांनीच प्रवेशाबाबत अनुकूलता दाखवीत विरोध करणाऱ्या मंडळींना सबुरीचा सल्ला देत गप केले. महाजन यांनी बडगुजर यांच्यासह काही मंडळींचा प्रवेश घडवून आणला. अजूनही अनेक मंडळींचा ते प्रवेश घडवून आणणार आहेत. महाजन यांचा शब्द प्रमाण मानत सारी मंडळी शांत असली तरी नाराजीची सल कुठेतरी बोचत असणारच. असो! भाई मंडळींसाठीही महाजन संकटमोचक ठरत असावेत. होर्डिंग तथा शुभेच्छा फलकांवरून नागरिकांच्या वेळोवेळी तसे निदर्शनास आलेले आहे. हे नाकारून चालणार नाही. त्यामुळे भविष्यात शहर-जिल्ह्यातील भाई मंडळी, गुन्हेगारीशी संबंधित मंडळी पावन होऊन भाजपच्या गोटात हाती कमळ घेऊन उभी ठाकलेली दिसली तर आश्चर्य वाटायला नको. भाजपचा पक्षवाढीसाठीचा तो गोमटा प्रयत्न असेल!

> महत्त्वाचे

## क्रिएटीव्ह बड्स, दसककर भगिनीतर्फे चित्ररत्न कार्यक्रम

**नाशिक ।** क्रिएटीव्ह बड्स आणि सुप्रसिद्ध गायिका दसककर भगिनी यांच्या समनव्यातुन दिनांक 21 व 22 जून रोजी कुसुमाग्रज स्मारक येथील छंदोमयी दालनात होणारे चित्र व हस्तकला प्रदर्शनाचे उदघाटन दिमाखात झाले. उदघाटन



ज्येष्ठ पत्रकार अभय ओझरकर, ज्येष्ठ छायाचित्रकर प्रसाद पवार, ज्येष्ठ मूर्तिकार श्रेयस गर्गे यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी दसककर भगिनी, पं माधव दसककर, राजा पाटेकर, पुरुषोत्तम भार्गवे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ईश्वरी कदडी व अश्विनी भार्गवे यांनी केले. प्रसाद पवार व श्रेयस गर्गे, रत्ना भार्गवे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. गुरू व ज्येष्ठ चित्रकार रत्ना भार्गवे यांच्या मार्गदर्शनाखाली दर मे महिन्यात होणाऱ्या शिबिरामधून लहानपणापासून ही सर्व मंडळी शिक्षण घेत होती. रत्ना भार्गवे यांनी सर्वांना चित्रकला व हस्तकलेचे प्रशिक्षण दिले. त्यांच्या झाडे गणपती निसर्ग आशा अनेक कलाकृती यापूर्वी नाशिककरांनी अनुभवल्या आहेतच. आता हे सर्वजण विविध क्षेत्रात कार्यरत असले तरीही 15 ते 20 वर्षांपासून मे महिन्याची ही परंपरा सातत्याने चालू ठेवली आहे. कामे सांभाळून आपल्यातील कला जपून आनंद वाटणे हा सामाजिक उद्देश या प्रदर्शनाचा आहे. यामध्ये मंडला आर्ट, मधूबनी, वार्ली, वॉटर कलर, झेंटँगल, क्रेयॉन, ग्रिटींग्ज, हस्तकला असे अनेक विविध प्रकार अनुभवायला मिळणार आहेत. सर्व नाशिककरांनी या कलाकृतींचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## प्रा. म्हात्रे यांच्या दोन पुस्तकांचे विजय भट यांच्या हस्ते प्रकाशन

**नाशिक ।** प्रा. जयप्रकाश म्हात्रे यांच्या सृष्टीच्या निर्माणाची गोष्ट व निंभर या दोन पुस्तकांचे मेट या संस्थेचे माजी प्राचार्य विजय



भट यांच्या हस्ते नुकतेच प्रकाशन झाले. म्हसरुळ बोरगड येथील संत गाडगे महाराज अभ्सासिकेत हे प्रकाशन झाले. यापुर्वी प्रा. म्हात्रे यांची अनुक्रमे तिनं पुस्तके प्रकाशित झाली आहेत. चार्ल्स डार्विन यांचे चरित्र तर उत्क्रांतीच्या वाटेवरील संस्कृतीची पावले व जनुकांची गोष्ट या पुस्तक प्रकाशनाच्या वेळी प्रा. शैलजा पाटील, राम गवारे, प्रतीमा भट, सुशिला म्हात्रे, सतीश जोशी आदी उपस्थित होते. सूत्रसंचलन योगेश भोये यांनी केले.

## अल्पवयीन मुलीला उचलून नेणाऱ्याला नागरिकांकडून चोप

**मनमाड ।** शहरातील मालेगाव नाका नजीक



असलेल्या सिकंदर नगर भागात एका ५ वर्षीय मुलीला उचलून घेऊन अपहरण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या २८ वर्षीय तरुणाला सतर्क नागरिकांनी चोप देऊन पोलीस प्रशासनाच्या ताब्यात दिल्याची घटना शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून या तरुणाला अटक केली आहे. याप्रकरणी मनमाड पोलीस स्थानकात विविध कलमान्वये अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मालेगाव चौफुली नजीक असलेल्या नांदगाव रोडवरील सिकंदर नगर भागात राहणाऱ्या अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. शुक्रवारी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास सिकंदर नगर येथील रिक्षा स्टॉप येथून पाच वर्षीय मुलगी आणि भावाची मुलगी हे दूध घेण्यासाठी दुकानात गेले असता नबा ज्योतीदास, वय-२८ वर्ष .रा. रामपुर ता. नैभी, जि.लखीमपूर, राज्य-आसाम आणि दोन अनोळखी इस्मानी अज्ञात कारणासाठी अपहरण करून मुलीला पळून घेऊन जात होते, असे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

## कावनईत छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिर

**कावनई ।** छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबीर अंतर्गत कावनई येथे महाशिबिराचे आयोजन करण्यात आले. ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांच्या दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सोडवून अधिक लोकाभिमुख कारभार करण्यासाठी मंडळ स्तरावर आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिर अभियान आयोजित केले होते. या शिबिरामध्ये सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांना उत्पन्न व विविध दाखले, शेतकरी दाखले, रेशन कार्ड संबंधित कामे, मोफत ७/१२ वाटप, सामाजिक लाभाच्या योजना जसे संजय गांधी निराधार योजना, पीएम किसान योजना, अॅग्रीस्टॅक योजना जीवत दाखला,आदी महसूल विभागाशी संबंधित विविध कामांसंबंधी मार्गदर्शन व निराकरण करणे हा या अभियानाचा हेतू आहे.

# सप्तश्रृंग गड देवी ट्रस्टच्या मुख्य कार्यालयासमोर महिला कर्मचाऱ्यांचे आमरण उपोषण सुरू...

**सप्तशृंग गड ।** श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट अंतर्गत कार्यरत असलेल्या दोन रोजंदारीवर महिला कर्मचाऱ्यांनी आपल्या कायमसेवेच्या मागणीसाठी आजपासून (दि. २१ जून) मुख्य कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने काम करणाऱ्या या महिला आता हक्कासाठी उघडपणे लढा देत आहेत.



यावेळी युनियनचे सदस्य, कर्मचारी आणि महिला उपोषणकर्त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "आम्ही वेळोवेळी ट्रस्टचे अध्यक्ष तसेच विश्वस्त मंडळ प्रतिनिधींना भेटून तथा पत्राद्वारे विनंत्या केल्या. मात्र, आजवर कोणताही सकारात्मक प्रतिसाद आम्हाला मिळालेला नाही." विशेष म्हणजे, या महिला २०१५-१६ दरम्यान अन्नपूर्णा प्रसादालयात रोजंदारी तत्त्वावर रुजू झाल्या होत्या. परंतु त्यानंतर नियुक्त झालेल्या काही कर्मचाऱ्यांना थेट कायमसेवेत समाविष्ट करण्यात आले, मात्र या महिलांना का डावलण्यात आले, असा सवाल यावेळी कामगार संघटनेचे प्रतिनिधी श्री. नारद आहिरे यांनी उपस्थित केला. तसेच, "स्थानिक आदिवासी महिलांना कायमसेवेत सामावून घेण्यास टाळाटाळ का?" असा थेट प्रश्नही यावेळी उपस्थित कर्मचाऱ्यांनी केला. "जोपर्यंत आम्हाला योग्य हक्क मिळत नाही, तोपर्यंत आमचे हे आमरण उपोषण सुरू राहील," असा इशाराही या महिला कर्मचाऱ्यांनी दिला. या संघर्षामागे नाशिक वर्कर्स युनियनचा पूर्ण पाठिंबा असून, यावेळी अनेक कर्मचारी उपस्थित होते. आंदोलनाचा पवित्रा अधिक तीव्र होत असल्यामुळे विश्वस्त संस्थेने यावर तातडीने सकारात्मक पावले उचलणे अपेक्षित आहे.

### १० वर्षांच्या सेवेनंतरही कायमसेवा नाही

श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्टच्या अन्नपूर्णा प्रसादालय विभागात २०१५-१६ पासून कार्यरत असलेल्या दोन रोजनदारी महिला कर्मचाऱ्यांना अजूनही कायमसेवेत घेतले गेलेले नाही, तर नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना कायम करण्यात आले. - **मनिषा बर्डे व कल्पना देशमुख**

### वारंवार विनंती करूनही दुर्लक्ष

कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी अध्यक्ष व विश्वस्त मंडळ प्रतिनिधींना समक्ष भेटून व लेखी पत्राद्वारे मागणी केली असताना देखील ट्रस्ट प्रशासनाने यावर कोणताही ठोस प्रतिसाद दिलेला नाही.

- **श्री. नारद आहिरे, कर्मचारी युनियन प्रतिनिधी**

### २१ जूनपासून बेमुदत आंदोलन सुरू

या अन्यायाविरोधात नाशिक वर्कर्स युनियनच्या नेतृत्वाखाली २१ जूनपासून ट्रस्टच्या मुख्यालयासमोर बेमुदत आंदोलन सुरू करण्यात आले असून, 'कायम सेवा मिळेपर्यंत उपोषण सुरू राहील' असा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे. - **कन्हैया जाधव, कॉम्रेड प्रमुख सल्लागार**

## मनमाड बाजार समितीची सुनावणी आता एक जुलैला

**मनमाड ।** येथील कृषि उत्पन्न बाजार संचालक मंडळांतील सदस्यांना २३ जून रोजीच्या सभेस हजर राहण्याच्या नोटीसा प्रभारी सचिवांतर्फे काढण्यात आल्या होत्या. या नोटीसीच्या अंमलबजावणीस उच्च न्यायालयाने स्थगिती देण्यात येत असून पुढील सुनावणी १ जुलै रोजी दुपारी ३ वाजता ठेवण्यात येत असल्याचेही पणन संचालकांनी शुक्रवार दि.२० रोजी दिलेल्या आदेशात म्हटले आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्यांचे होणारे पगार आता पुन्हा लांबणीवर पडले आहेत.



बाजार समितीतील सर्व कर्मचाऱ्यांचे तीन महिन्यांचे वेतन थकलेले असून ते अदा करण्यात यावेत, तसेच सचिवांसह तीन कर्मचाऱ्यांचे बेकायदेशीर निलंबन रद्द करावे, या प्रमुख विषयांसाठी बाजार समितीची विशेष सभा प्रभारी सचिवांच्या सह्यांनी सोमवार दि.२३ जून रोजी आयोजित करण्यात आल्याचा अजेंडा पाठविण्यात आला होता. वरील मागण्यांसाठी बाजार समितीचे सर्व २९ कर्मचारी यांनी सोमवार दि.१६ रोजी बाजार समितीसमोर काम बंद आंदोलन सुरू केले होते. यावेळी नांदगांवचे तहसीलदार एस.एम.सैंदाणे व सहाय्यक निबंधक अर्चना सैंदाणे यांनी हस्तक्षेप केला. २३ जून रोजी बाजार समितीच्या संचालक मंडळाची विशेष सभा आयोजित करण्यात आली असून त्यात वरील मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले होते. त्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले. परंतु या विशेष सभेलाच आता स्थगिती देण्यात आली आहे. बाजार समितीचे सभापती दिपक चंद्रकांत गोगड यांनी २३ जूनच्या विशेष सभेबाबत प्रभारी सचिवांनी काढलेली नोटीस रद्द करण्यात यावी, यासाठी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्यावर आज शुक्रवार दि.२० रोजी सुनावणी झाली. या याचिकेचे रूपांतर महाराष्ट्र कृषी उत्पन्न, पणन अधिनियम १९६३ चे कलम ५२ बी अन्वये अपिलामध्ये करून दोन दिवसानंतर होणाऱ्या या सभेला अंतरीम स्थगिती मिळण्याचा अर्ज शुक्रवार दि.२० जून रोजीच निकाली काढण्याबाबत उच्च न्यायालयाने राज्य पणन संचालकांना आदेशीत केले होते. त्यानुसार या सभेस पणन संचालकांनी आज तडकाफडकी स्थगिती दिली आहे. बाजार समितीत सध्या काही महिन्यांपासून सत्तेसाठी सुंदोपसुंदीचे राजकारण सुरू आहे त्याचा फटका कर्मचाऱ्यांसह शेतकरी, व्यापारी यासह सर्वच बाजार घटकांना बसत आहे. सभापती दीपक गोगड हे अधिकाराचा गैरवापर करून कर्मचारी वर्गावर अन्याय करून त्यांना अकारण त्रास देत आहेत, तसेच बाजार समितीकडे निधी असताना देखील हेतूपुरस्कार कामगारांचे तीन महिन्याचे पगार केलेले नाही. या त्रासाला कंटाळून बाजार समितीतील सर्व २९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी निबंधक व संबंधितांकडे निवेदन देऊन १६ जूनला काम बंद आंदोलनाचा निर्णय घेतला होता.

## लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंच, पद्माक्षी चॅरिटेबल ट्रस्टच्या कार्यक्रमात मान्यवरांचे मार्गदर्शन



**नाशिक ।** दहावी, बारावीनंतर करिअरला दिशा मिळते. त्यामुळे या कालावधीत योग्य पर्यायाची निवड करणे आवश्यक असते. आपल्या आवडीनिवडीनुसार अभ्यासक्रमाची निवड करावी व शिक्षण सुरु असतांना कष्ट करत यशस्वी करिअर घडवावे, असा सल्ला अनेक मान्यवरांनी सोमवारी गंगापूर रोडवरील डॉ.शंकराचार्य न्यास कुर्तकोटी सभागृह येथे झालेल्या कार्यक्रमातून दिला.

लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंच व पद्माक्षी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विद्यार्थी सत्कार व करियर मार्गदर्शन कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वक्त्यांसमवेत लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंचेचे उपाध्यक्ष बाळकृष्ण दंडगावकर, सचिव रमेश डहाळे, जितेंद्र येवले, देवराम सैंदाणे, मीनल कुलकर्णी, विठ्ठल सावंत, विनोद दशपुते, उत्तमराव कडलग, प्रकाश महाजन, वैशाली पिंगळे उपस्थित होते. प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. देविका पाटील यांनी "आयुष्यातील परीक्षांना कसे सामोरे जायचे" या विषयावर मार्गदर्शन केले. यश आणि अपयश हे जीवनाचा भाग आहेत. त्यामुळे यशस्वी झालो तर आनंद साजरा करावा. तर अपयश आले तर त्यातून शिकवण घेत भविष्यात योग्य दिशेने वाटचाल करावी. परीक्षा हा विद्यार्थी जीवनातील अविभाज्य भाग आहे. वर्षभर अभ्यासात सातत्य ठेवताना तणावमुक्तपणे परीक्षांना सामोरे जावे, असा सल्ला त्यांनी दिला. यानंतर स्पेक्ट्रम अकॅडमीचे संचालक सुनील पाटील यांचे 'शिक्षणाच्या दिशा' विषयावर मार्गदर्शन झाले. प्रशासकीय सेवेमध्ये दाखल होऊन चांगले करिअर घडविण्यासाठी समाजसेवेची संधी उपलब्ध असते. स्पर्धा परीक्षांमध्ये प्रचंड स्पर्धा वाढली असून, यशस्वी व्हायचे असेल तर योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. शासकीय, निमशासकीय क्षेत्रात उत्तम संधी उपलब्ध असून, त्याची माहिती करुन घेत तयारीला लागावे, असा सल्ला दिला. रामकृष्ण पॅरामेडिकल अँड हेल्थ सायन्सेस कॉलेजचे निखिल पाठारे यांचे 'आरोग्य क्षेत्रातील करियर केंद्रित पॅरामेडिकल कोर्सेस' विषयावर सत्र झाले. कोरोना महामारीनंतर वैद्यकीय क्षेत्राचे महत्व अधिकच वाढले आहे. डॉक्टरांसोबत इतर प्रशिक्षिक स्टाफची वैद्यकीय क्षेत्राला आवश्यकता आहे. पॅरामेडिकलमध्ये प्रचंड संधी उपलब्ध झाल्या असून, यामध्ये चांगले करिअर करता येऊ शकते, असे सांगतांना त्यांनी उपलब्ध अभ्यासक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमानिमित्त दहावी, बारावीमध्ये चांगल्या गुणांसह यश मिळविलेल्या १७० विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

## देवळा अभिनव, जनता विद्यालयात नवागतांचे स्वागत, गुणवंतांचा सत्कार

**देवळा ।** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या अभिनव व जनता विद्यालय देवळा शाळेत सन २०२५-२६ या नविन शैक्षणिक वर्षातील नवागतांचे स्वागत तसेच इ ,१० वी च्या शालांत परीक्षेत ९०,% पेक्षा अधिक गुणांसह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना बुके, बुक, अभिनंदन पत्र देऊन मविप्र तालुका संचालक विजय नाना पगार यांच्या हस्ते गौरविण्यात आले.



यात विद्यालयातील विद्यार्थिनी कसमादे परिसरात प्रथम आलेल्या तृप्ती निकम तसेच जान्हवी जाधव,प्रणव खैरनार, ओम शिंदे, रोशनी सूर्यवंशी, मनस्वी पवार राशी जाधव,हर्षल पवार आदि विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. यावेळी संचालक विजय पगार यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत अशाच प्रकारचे यश भविष्यात मिळवावे अशी अपेक्षा व्यक्त करत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अनुकरण करावे व आपणही उत्तुंग यश मिळवावे असे आवाहन याप्रसंगी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश आहेर यांनी केले.

## विद्यार्थ्यांना शाळेतच पास काढून दिल्याने समाधान

**देवळा ।** येथील श्रीशिवाजी मराठा इंग्लिश स्कूलमध्ये बाहेरगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांना एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी या सर्व विद्यार्थ्यांना शाळेतच पास काढून दिल्याने विद्यार्थ्यांनी व पालकांनी समाधान व्यक्त केले.



देवळा तालुक्यातील अनेक गावातील विद्यार्थी देवळा येथे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी येत असतात. त्यामध्ये खर्डे , मटाने, वरवंडी, भऊर, माळवाडी, खालप, वाजगाव, वडाळा, वाखारी, वाखारवाडी, सरस्वतीवाडी, रामेश्वर अशा अनेक गावातील विद्यार्थी बसने प्रवास करून येतात. पास काढण्यासाठी विद्यार्थ्यांची धावपळ होतें . याची दखल घेऊन शासनाच्या वतीने चालू शैक्षणिक वर्षांपासून एसटी महामंडळाच्या वतीने शाळेतच पास काढून देण्याचा निर्णय घेतला असून, शुक्रवारी दि २० रोजी एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी याठिकाणी सर्व विद्यार्थ्यांना एकाच ठिकाणी पास काढून देण्याची सोय करून दिली.

यावेळी सटाणा आगार व्यवस्थापक राजेंद्र आहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक नियंत्रक भूषण आहेर व संजय खैरे यांनी विद्यालयातील इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या बाहेरगावाहून प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांना एस.टी.बसचा पास काढून दिला व त्यांचे वाटप विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय पगार व संजय खैरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी परिवहन समिती प्रमुख एच.एन.मांडवडे तसेच विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## कार्टून चित्रांच्या छत्र्या, रेनकोट खरेदीसाठी लगबग

**मनमाड । नैवेद्या बिदरी ।** बच्चे कंपनीने कार्टूनचे वेड लक्षात घेऊन विविध प्रकारच्या साहित्यावर त्याची छाप पडलेली दिसत आहे. रेनकोट आणि छत्र्याही याच प्रभावाखाली आहेत. विशेषतः बच्चे कंपनीच्या या वस्तूंवर कार्टून हमखास दिसत आहेत. यंदा २५० पासून ९०० रुपये किमतीच्या छत्र्याची विक्री सुरू आहे. त्यांच्या दरात ८ ते १० टक्के वाढ झाली आहे.

बाजारपेठेत शाळेची पुस्तके, वा दप्तर याबरोबरच छत्र्यांची खरेदी सुरू झाली आहे. लहान मुलांसाठी कार्टून प्रिंटची छत्री आणि रेनकोट उपलब्ध आहेत. या पावसाळ्यात

### यंदा दरांमध्ये ८ ते १० टक्के झाली वाढ



लहान मुलांच्या रेनकोटमध्ये विविध कार्टून्सचा ट्रेंड पाहायला मिळत आहे. यामध्ये डोरेमॉन, छोटा भीम, मोटू पतलू, स्पायडर मॅन, तर, लहान मुलींसाठी डोरा, बार्बी डॉल, सिंडेला यांचे छायात्रि असलेले रेनकोट बाजारात आले आहे. अशाच नवीन ट्रेंडच्या छत्र्या, रेनकोटसाठी लहान मुले पालकांकडे आग्रह धरीत आहेत.

दरवर्षी ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी नवीन ट्रेंड आणला जातो. यंदाही तसा प्रयत्न झाला आहे. बाजारात पारंपरिक छत्रीसोबतच रेनबो छत्री, थ्रीडी आणि रंग बदलणारी छत्री नव्याने दाखल झाल्या असून सगळ्यांचे लक्ष वेधले आहे.

### बाजारात नवे काय...

नवनव्या फॅशनच्या छत्र्या बाजारात दाखल झाल्या आहेत. बाजारात सध्या रेनकोट, छत्र्या, पावसाळी टोप्या, ताडपत्री, प्लास्टिक पेपर आणि अन्य साहित्य खरेदी करण्यासाठी नागरिक गर्दी करत आहेत. छत्र्या २५० रुपयांपासून ते ९०० रुपयांपर्यंत मिळत आहेत. नामांकित कंपन्यांच्या चप्पल, शूज आहेत. अगदी २५० ते ९०० रुपयांपर्यंतच्या छत्र्या बाजारात विक्रेत्यांनी आणल्या आहे.

### खरेदीसाठी लगबग...

सध्या शाळा सुरु झाल्या असून पालकांनी शालेय साहित्याची खरेदी सुरु केली आहे. त्यामध्ये सर्व प्रथम छत्री, रेनकोट, पावसाळी टोप्या खरेदीकडे पालकांचा भर दिसत आहे. शहरातील मुख्य बाजारपेठा, मॉलमध्ये पावसाळी साहित्य मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी विक्रेत्यांनी आणले आहे. विविध डिझाईनच्या फॅन्सी छत्र्या, टोप्या सर्वांचेच लक्ष वेधून घेत आहेत.

